# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## //गोषवारा //

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण २ कलम १ (र) नुसार फेरबदल करणे.**

**प्रकरण क्र.९५९:- जाहिरात फी महसुलाबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी जागेत व महानगरपालिकेच्या जागेत होर्डिंग उभारुन जाहिरात प्रसिध्द करणेस परवानगी देण्यांत येते. सदर जाहिरात फलकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५६ - अ पोटकलम (१) आणि कलम २४४, २४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार कार्यवाही करण्यांत येत होती. त्यानुसार शहरात नव्याने होर्डिंग उभारण्याचा ठेका माहे एप्रिल – २०२२ मध्ये ९० होर्डिंग उभारण्याची निविदा प्ररिध्द करण्यांत आली होती.

१) सदर निविदेस प्रतिसाद ही प्राप्त झाला होता. परंतु माहे ०९ मे २०२२ मध्ये शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अधिसुचनेनुसार सदर नियमातील कलम ५ (त) "पदपथावर व सार्वजनिक रस्त्यांवर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यांत येणार नाही" असे नमुद आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणेकरीता प्राप्त होर्डिंग व ॲडपोलची निविदा रद्द करुन नियमाची अंमलबजावणी करणेकामी जाहिरात विभागाचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील पदपथ अथवा सार्वजनिक रस्त्यांलगत नसतील अशा जागांचे सर्वेक्षण करुन सल्लागाराच्या प्राप्त अहवालानुसार पुन्हा नव्याने होर्डिंग अथवा इतर जाहिरातींचे स्त्रोत यांची माहिती संकलीत करणेकरीता जाहिरात विभागास सल्लागार नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल.

२) तसेच सद्यस्थितीत चालु असलेल्या ठेक्यातील होर्डिंगची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | होर्डिंग संख्या |
|---|---|---|
| १ | मे. उमराव इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल | ५ |
| २ | मे. सरस्वती ॲडव्हटायजिंग सर्विस | ५१ |
| ३ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | २२ |
| ४ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | ३० |
| ५ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | ६ |
| | एकुण | ११४ |

सदरच्या ठेक्यास नविन निविदाकारास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. परंतु या उभारलेल्या होर्डिंगपैकी बहुतांश होर्डिंग ह्या पदपथावर व रस्त्यांलगत उभारलेल्या आहेत. शासन नियम २०२२ ची अंमलबजावणी केल्यास चालु असलेल्या ठेक्यातील होर्डिंग सुध्दा हटविणे आवश्यक आहे.

याबाबत दि.२१/११/२०२२ रोजी प्रशासकिय ठराव क्र. ११८ पारीत झाला असुन. सदरच्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण २ कलम १ (र) नुसार खालीलप्रमाणे फेरबदल करावे.

माहे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मार्च – २०२३ पर्यंत ठेका होर्डिंग अंदाजे रक्कम **रु.१,७१,२७,३६४/-** इतकी जाहिरात फी अपेक्षित आहे. त्यापैकी माहे नोव्हेंबर -२०२२ पर्यंत रक्कम **रु.८१,०४,१५६/-** इतकी जाहिरात फीची वसुली करण्यांत आलेली आहे. सदरच्या ठेक्यातील सर्व होर्डिंग दि.१६/१२/२०२२ पासून हटविण्यांत आल्यास दि.१५/१२/२०२२ पर्यंत रक्कम **रु.३९,१३,९४७/-** वसुली करणे बाकी राहील. संबंधित रक्कमेचे देयके अदा करुन वसुल करण्याची प्रक्रिया चालु करण्यांत येईल. वरील ठेक्यातील सर्व होर्डिंग दि.१६/१२/२०२२ पासुन हटविल्यास या आर्थिक वर्षातील शिल्लक राहीलेले दि.१६/१२/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ या कालावधीतील होणारी जाहिरात फी रक्कम **रु.५१,०९,२६१/-** एवढी प्राप्त होणार नाही. करीता सध्या ठेक्यातील चालु होर्डिंग हटविणे तसेच त्यामुळे अपेक्षित महसुल प्राप्त होणार नसल्याने सदरबाबत प्रशासकिय मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ च्या अधिन राहून निविदा रद्द करणे तसेच सद्यस्थितीतील चालु असलेल्या ठेका होर्डिंगमधील पदपथावरील व सार्वजनिक रस्त्यांवरील जाहिरात फलक हटविण्याबाबत उपरोक्त फेरबदलानुसार निर्णय होणेस्तव विचार विनिमय होवून निर्णय घेणेस शिफारस आहे.

**(रवि पवार)**
**उपआयुक्त (जाहिरात)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)**

मागवारा प्राप्त दि. ०८/१२/२०२२ वेळ ५=२५ वा.
प्रशासकीय पत्र ... नोंद
रजिस्टर अ.क्र. ९६५ वर्ष २०२२/२३
०८/१२/२०२२
लिपिक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव दि.१३/१२/२०२२ रोजी दुपारी २.०० ....... वाजता

**विषय :- जाहिरात फी महसुलाबाबत.**
१५५

## कार्यालयीन प्रस्ताव

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी जागेत व महानगरपालिकेच्या जागेत होर्डिंग उभारुन जाहिरात प्रसिध्द करणेस परवानगी देण्यांत येते. सदर जाहिरात फलकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५६ - अ पोटकलम (१) आणि कलम २४४, २४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार कार्यवाही करण्यांत येत होती. त्यानुसार शहरात नव्याने होर्डिंग उभारण्याचा ठेका माहे एप्रिल – २०२२ मध्ये ९० होर्डिंग उभारण्याची निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

१) सदर निविदेस प्रतिसाद ही प्राप्त झाला होता. परंतु माहे ०९ मे २०२२ मध्ये शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अधिसुचनेनुसार सदर नियमातील कलम ५ (त) "पदपथावर व सार्वजनिक रस्त्यांवर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यांत येणार नाही" असे नमुद आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणेकरीता प्राप्त होर्डिंग व ॲडपोलची निविदा रद्द करुन नियमाची अंमलबजावणी करणेकामी जाहिरात विभागाचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील पदपथ अथवा सार्वजनिक रस्त्यांलगत नसतील अशा जागांचे सर्वेक्षण करुन सल्लागाराच्या प्राप्त अहवालानुसार पुन्हा नव्याने होर्डिंग अथवा इतर जाहिरातींचे स्त्रोत यांची माहिती संकलीत करणेकरीता जाहिरात विभागास सल्लागार नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल.

२) तसेच सद्यस्थितीत चालु असलेल्या ठेक्यातील होर्डिंगची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | होर्डिंग संख्या |
|---|---|---|
| १ | मे. उमराव इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल | ५ |
| २ | मे. सरस्वती ॲडव्हटायजिंग सर्विस | ५१ |
| ३ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | २२ |
| ४ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | ३० |
| ५ | मे. आदित्य ॲडव्हटायझर्स | ६ |
| | एकुण | ११४ |

सदरच्या ठेक्यास नविन निविदाकारास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. परंतु या उभारलेल्या होर्डिंगपैकी बहुतांश होर्डिंग ह्या पदपथावर व रस्त्यांलगत उभारलेल्या आहेत. शासन नियम २०२२ ची अंमलबजावणी केल्यास चालु असलेल्या ठेक्यातील होर्डिंग सुध्दा हटविणे आवश्यक आहे.

याबाबत दि.२१/११/२०२२ रोजी प्रशासकिय ठराव क्र. ११८ पारीत झाला असुन. सदरच्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण २ कलम १ (र) नुसार खालीलप्रमाणे फेरबदल करावे.

माहे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मार्च – २०२३ पर्यंत ठेका होर्डिंग अंदाजे रक्कम **रु.१,७१,२७,३६४/-** इतकी जाहिरात फी अपेक्षित आहे. त्यापैकी माहे नोव्हेंबर -२०२२ पर्यंत रक्कम **रु.८१,०४,१५६/-** इतकी जाहिरात फीची वसुली करण्यांत आलेली आहे. सदरच्या ठेक्यातील सर्व होर्डिंग दि.१६/१२/२०२२ पासून हटविण्यांत आल्यास दि.१५/१२/२०२२ पर्यंत रक्कम **रु.३९,१३,९४७/-** वसुली करणे बाकी राहील. संबंधित रक्कमेचे देयके अदा करुन वसुल करण्याची प्रक्रिया चालु करण्यांत येईल. वरील ठेक्यातील सर्व होर्डिंग दि.१६/१२/२०२२ पासुन हटविल्यास या आर्थिक वर्षांतील शिल्लक राहीलेले दि.१६/१२/२०२२ ते

दि.३१/०३/२०२३ या कालावधीतील होणारी जाहिरात फी रक्कम **रु.५१,०९,२६१/-** एवढी प्राप्त होणार नाही. करीता सध्या ठेक्यातील चालु होर्डिंग हटविणे तसेच त्यामुळे अपेक्षित महसुल प्राप्त होणार नसल्याने सदरबाबत प्रशासकिय मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ च्या अधिन राहून निविदा रद्द करणे तसेच सद्यस्थितीतील चालु असलेल्या ठेका होर्डिंगमधील पदपथावरील व सार्वजनिक रस्त्यांवरील जाहिरात फलक हटविण्याबाबत उपरोक्त फेरबदलानुसार निर्णय होणेस्तव विचार विनिमय होवून निर्णय घेणेस शिफारस आहे.

**सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र.**...९५२... **दिनांक** १३/१२/२०२२

उपरोक्त प्रमाणे जाहिरात विभागाने प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण २ कलम १ (र) नुसार पुढीलप्रमाणे फेरबदल करण्यांत येत आहे. जाहिरात विभागामार्फत होर्डिंग व अॅडपोलकरीता निविदा मागविण्यांत आल्या होत्या सदर निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला होता तथापि, माहे ०९ मे २०२२ मध्ये शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अधिसुचनेनुसार सदर नियमातील कलम ५ (त) "पदपथावर व सार्वजनिक रस्त्यांवर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यांत येणार नाही" असे नमुद आहे. त्यानुसार सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणेकरीता प्राप्त होर्डिंग व अॅडपोलची निविदा रद्द करुन तसेच जाहिरात विभागातील सद्यस्थितीत चालु असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवर देण्यांत आलेला ठेका होर्डिंग व इतर होर्डिंग करीता देण्यांत आलेल्या सर्व परवानगी दि.१५/१२/२०२२ रोजीपासुन रद्द करणे व सदर कालावधीपर्यंतची जाहिरात फी रक्कमेची वसुली करुन होर्डिंग हटविणेची कार्यवाही करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच दि.१६/१२/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ ह्या कालावधीतील प्राप्त न होणारी रक्कम अंदाजपत्रकातुन कमी करण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :- जाहिरात विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.**